# पोलीस मित्र

**प्रस्तावना :** **नाशिक ग्रामीण**

महात्मा गांधी यांनी असे म्हटले आहे की, जनतेच्या सहभागा शिवाय पोलीसांना आपले काम करणे शक्य नाही, म्हणुन जनतेच्या सहभागा शिवाय पोलीसांनी समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे शक्य नाही, जनते मधुन पोलीस मित्र तयार झाल्या शिवाय जनते मधील शेवटच्या घटका पर्यंत पोलीस पोहचु शकत नाही, कारण पोलीस या यंत्रणे विषयी लोकांच्या मनात ब्रिटीश काला पासुन जो दुरावा निर्माण झाला आहे, तो कमी करण्यासाठी पोलीस मित्राची फार मदत होते. म्हणुन प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्यीत पोलीस मित्र ही संकल्पना राबविणे ही काळाची गरज आहे.

सध्या भारतामध्ये पोलीस यंत्रणा हि देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेमध्ये महत्वाची भुमिका पार पाडत आहे, त्या बरोबरच पोलीसांना गुन्हे अन्वेषण, गुन्हे प्रतिबंध, सामाजिक शांतता व सुव्यवस्था ठेवणे, वाहतुकीचे नियमन करणे अशी महत्वाची वेगवेगळी कामे करावी लागतात.

सध्याचे काळामध्ये वाहतुक व दळणवळणाच्या विकसित झालेल्या साधानांमुळे गुन्हेगारीचे प्रमाण व प्रकारामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. या साधानांमुळे गुन्हेगारांना कोणताही प्रदेश, राज्य अथवा देशाच्या सिमेचे बंधन राहिलेले नाही. यामुळे पोलीसांसमोर आव्हाने वाढली आहेत. एकीकडे अशा प्रकारची आव्हाने वाढलेली असतांनाच पोलीस मात्र समाजापासुन वेगळा पडलेला आहे. समाजामध्ये, प्रसारमाध्यमांमध्ये तसेच लोकप्रतिनिधीमध्ये पोलीसांची नकारात्मक प्रतिमा निर्माण झालेली आहे. याचाच परिणाम म्हणुन पोलीस आणि जनता यांचेमध्ये परस्पर विश्वासाचे, आदराचे आणि आत्मविश्वासाचे वातावरण नाहीसे झालेले आहे. यामुळे ब-याच ठिकाणी पोलीस - जनता असे संघर्षाचे चित्र निर्माण झालेले दिसते. याचा विपरित परिणाम पोलीसांच्या कार्यावर होतो.

ब-याच वेळेसे असे निदर्शनास आले आहे की, पोलीस हे कायदयाचे पालन करणारे समाजातील बहुसंख्य लोक आणि तुलनेने कायदयाचे भंग करणारे अल्पसंख्य लोक यांना ओळखण्यास अपयशी ठरलेले आहेत. म्हणुन पोलीस जरी जनतेचे संरक्षणासाठी असले तरी देखील त्यांना लोकांच्या सदिच्छा किंवा माहिती, अभिप्राय किंवा पुरेसे सहकार्य मिळत नाही. खाकी वर्दीमध्ये असणारी व्यक्ती हि क्रुर, हिंसक तसेच रागीट स्वरूपाची असते असा गैरसमज लोकांमध्ये निर्माण झालेला आहे. पोलीस यंत्रणेच्या एखादया चुकीची चर्चा संपुर्ण देशभर केली जाते. परंतु पोलीसांनी केलेल्या चांगल्या कार्याची प्रशंसा कोणीही करत नाही. पोलीसांची जनमाणसातील हि प्रतिमा सुधारण्यासाठी आणि पोलीसांना दैनंदिन कार्यात मदत व्हावी म्हणुन आपण ‘‘**पोलीस-मित्र हि संकल्पना**’’ राबवित आहोत.

पोलीसांचे सर्व कार्य हे जनतेशी संबंधीत आहेत, त्यामुळे पोलीस - जनता यामध्ये परस्पर विश्वास व सहकार्य या दोन गोष्टींची नितांत गरज आहे. सामान्य व्यक्तींना पोलीसांकडे जेव्हा मदतीची गरज असते, तेव्हा ती मदत सहजरित्या पोहचली पाहिजे आणि पोलीसांकडुन तात्काळ मदत मिळाली पाहिजे. परंतु हे सध्या काही व्यक्ती भिती, अविश्वास किंवा अन्य कारणांमुळे पोलीसांकडे येत नाही. यामध्ये आवश्यक असणारा बदल पोलीस मित्र या संकल्पनेव्दारे साकारला जावु शकतो.

सर्व सामान्यपणे भारतीय नागरीक हा साध्या वेषातील पोलीसच आहे. प्रत्येक  नागरीकाने पोलीसांची भुमिका पार पाडल्यास समाजातील वाईट घटक, वृत्ती यांना आळा बसुन समाजातील गुन्हेगारी वृत्तीला निश्चित लगाम बसेल, अशी माफक अपेक्षा आहे. पोलीस मित्र या अभियानात नाशिक ग्रामीण जिल्हयातील शाळा, महाविद्यालय, महाविद्यालयातील प्राचार्य, विद्यार्थी, विद्यार्थीनी, युवक, युवती, वकील, डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते, एनजीओ असे समाजातील विविध स्तरातुन पोलीस मित्रांसाठी त्यांची निवड करावी. सदर संकल्पनेत सर्व जाती धर्मातील लोकांचा समावेश असणे, गरजेचे आहे. त्याशिवाय सदरची संकल्पना राबवितांना जो हेतु आहे, तो साध्य होण्यास मदत होईल.

**<u>पोलीस मित्रांचे अपेक्षित कर्तव्ये :-</u>**

१) प्रत्येक शाळा, कॉलेजेस मध्ये शिकणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच प्राध्यापक यांच्या मदतीने काही ना काही प्रमाणात अतंकवादावर आळा बसविण्यासाठी प्रयत्न केला जावु शकतो, जसे तरुण विद्यार्थी विद्यार्थीनी, प्राध्यापक यांनी रोजच्या जीवनात वावरतांना रस्त्याने जातांना काही संशयास्पद वस्तु जसे रस्त्यात किंवा रस्त्याचे कडेला एखादी पिशवी किंवा बॅग दिसणे, ती दिसता क्षणी त्यांनी नजीकच्या पोलीस स्टेशनशी किंवा नियंत्रण कक्षाशी त्वरीत संपर्क साधुन सदर घटने बाबत माहिती द्यावी. तसेच कॉलेजमध्ये काही परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत असतील तर त्यांच्या हालचाली विषयी संशय आल्यास कोणत्याही धर्माचे अगर तरुणाचे हालचाली संशयीत वाटत असल्यास तसेच कोणाजवळ स्फोटके किंवा अवैध शस्त्रे दिसल्यास, दोन धर्मीयांमध्ये तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे पोस्टर्स, बॅनर्स, व्हीडीओ क्लिप, ऑडीओ क्लिप प्रत्यक्ष वाटप करतांना तसेच वॉट्सअप, फेसबुक, टिव्टर व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातुन प्रसारीत होत असतील तर तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा.

२) आपले शाळेच्या/कॉलेजच्या अवती भोवती कोणी अमली पदार्थांची विक्री करीत असले बाबत व त्या अमली पदार्थाच्या आहारी काही विद्यार्थी अथवा विद्यार्थीनी जात आहे असे आढळुन आल्यास तसेच अमली पदार्थ पुरविणा-या इसमा बाबत त्याचे वाहना बाबत वाहनाचे प्रकार, क्रमांक वगैरे माहिती तात्काळ पोलीसांना द्यावी.

३) रोजच्या दैनंदिन जीवनात रस्त्यावर किंवा घरात असलेल्या परिसरात काही अनुचित प्रकार उदा.दंगल, अफवा पसरविणे, मारहाणीचे प्रकार तसेच घातकशस्त्र किंवा स्फोटक कोणी बाळगत असतांना दिसल्यास त्या व्यक्तीचे वर्णन व त्याने वापरलेल्या वाहनाचा प्रकार आपलेकडेस नोंदविणे गरजेचे असुन त्याबाबत माहिती तात्काळ पोलीसांना कळविणे.

४) ज्या वेळेस आपण बस, रेल्वे, ऑटोरिक्षा इत्यादी मध्ये प्रवास करत असतांना कोप-यात एखादी बॅग अथवा पिशवी सिट वर संशयास्पद दिसल्यास तात्काळ तिकीट कंन्डक्टर, बस कन्डक्टर किंवा पोलीसांना माहिती द्यावी.

५) रेल्वेत प्रवास करत असतांना एक व्यक्ती दुस-या व्यक्तीशी बोलतांना खाणा, खुना करीत असेल किंवा हालचाली संशयास्पद वाटल्यास पोलीसांना संपर्क साधावा.

६) आपण वास्तव्यास असलेल्या ठिकाणी बिल्डींगमध्ये किंवा सोसायटीत शेजारी राहणारे कुटुंबे सणा निमीत्त किंवा सुट्टयांमध्ये गांवी निघुन गेलेली असतात. त्यावेळी त्यांच्या घरास कुलुप असले तरी रात्री अपरात्री कोणी कुलुप तोडतांना किंवा उघडतांना दिसल्यास त्या संशयीतां संबंधीची माहिती पोलीसांना तात्काळ द्यावी.

७) आपण वास्तव्यास असलेल्या सोसायटी किंवा अपार्टमेंटच्या पार्कींग मध्ये कोणी अनोळखी संबंधीत इसमाने वाहन लावतांना आढळुन आल्यास त्याबाबत वॉचमनकडे चौकशी करावी व तात्काळ पोलीसांना कळवावे.

८) सध्याच्या कॅम्प्युटर युगात फेसबुक वॉट्सअप, ट्विटर इत्यादी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन दहशतवाद विरोधी माहिती देत असल्यास त्याबाबत तात्काळ पोलीसांना कळवावे.

९) कॅम्प्युटरच्या युगात फेसबुक वॉट्सअप, ट्विटर इत्यादी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन दोन धर्मीयां मध्ये किंवा दोन जातीमध्ये तेढ निर्माण होईल अशा रितीने जातीय अथवा धर्माच्या भावना दुखावतील, अशा पोस्ट (माहिती, फोटो, व्हिडीओ क्लिप व ऑडीओ क्लिप) पसरविल्या जात असतील, तर त्याबाबत पोलीसांना कळवावे.

१०) फेसबुक वॉट्सअप, ट्विटर इत्यादी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन विद्यार्थी अगर विद्यार्थीनी यांच्या विषयी अभद्र व अश्लिल अथवा कोणत्याही प्रकारचा आक्षेपार्ह मजकुर प्रसारित करत असतील, किंवा महिला अगर विद्यार्थीनी यांनी लैंगीक छळा विषयीची माहिती प्रसारीत होत असल्यास तात्काळ पोलीसांना कळवावे.

११) शाळेत महाविद्यालयात कोणी विद्यार्थी व्यतिरिक्त बाहेरील इसम येत जात असतील, विद्यार्थी विद्यार्थीनी यांच्या मिटींग घेत असतील व त्यांच्या संगतीत वावरणारे व्यक्ती हे संशयास्पद वाटत असतील तर त्याबाबतची माहिती पोलीसांना कळवावी.

१२) सोसायटीत किंवा अपार्टमेंटमध्ये किंवा आपण राहत असलेल्या किंवा येणे जाणे असलेल्या गल्लीत अचानक नवीन व्यक्ती राहण्यास आल्यास त्याचे वागणे संशयास्पद वाटणे, त्याच्या येणे जाण्याच्या वेळा निश्चित नसणे, त्याचेकडे येणारे जाणारे लोकांच्या हालचाली संशयास्पद असतील तर त्याबाबत लोकांच्या हालचाली संशयास्पद असतील तर त्याबाबतची माहिती जमुन पोलीसांना द्यावी.

तसेच सोसायटीत नेमलेल्या सिक्युरिटी गार्डची ओळख व त्याची चारीत्र पडताळणी पोलीस खात्यामार्फत झाली आहे, अगर नाही याबाबत खात्री करावी व त्याबाबत सोसायटीच्या चेअरमनच्या लक्षात याबाबी आणुन द्याव्यात. तसेच गार्डला भेटायला येणारे लोक व त्याचे संपर्कात असलेले लोक यांचेवर लक्ष ठेवुन त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्यास सोसायटीच्या चेअरमनला किंवा पोलीसांना तात्काळ कळवावे. गार्ड त्याची डयुटी चोख बजावतो का नाही, हे त्या सोसायटीच्या तरुणांनी दररोज घेतली पाहिजे.

१३) यात्रा, धार्मीक स्थळे, मॉल, सिनेमागृहे इत्यादी ठिकाणी वस्तु उदा.रेडीओ, बॅग, खेळणी, कुकर, बाहुली, घडयाळ संयशीत रित्या आढळुन आल्यास त्याबाबत माहिती तात्काळ पोलीसांना कळवावी व तात्काळ तेथील परिसरातील लोकांना शंका व्यक्त करुन त्यावस्तु पासुन लांब जाण्याची सुचना करावी व वस्तुच्या आजु बाजुला गोलाकार आडोसा तयार करावा.

१४) ऑटोरिक्षा, टॅक्सी खाजगी बसेसने प्रवास करत असतांना प्रवास संपल्यानंतर त्या वाहनाचा प्रकार व वाहन क्रमांक नोंद करुन घ्यावा. जेणे करुन आपली काही वस्तु हरविल्यास, चोरी झाल्यास व नंतर काही लक्षात आल्यास पोलीस स्टेशनला माहिती देता येते.

१५) आपण ऑटोरिक्षामध्ये प्रवास करीत असतांना ऑटोमध्ये बसल्यावर समोर असणा-या काचेवर लिहीलेला मजकुर आत डेकोरेशन निरखुन पहावे. ऑटोरिक्षा चालकाचे हालचालींवर लक्ष ठेवावे. रस्त्यात त्याला भेटणा-या इसमांवर लक्ष ठेवुन त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्यास तात्काळ माहिती पोलीसांना द्यावी. समाजात वावरतांना ऑटोरिक्षा, टॅक्शी चालकांच्या हालचाली संशयास्पद वाटल्यास तात्काळ पोलीसांना कळवावे.

१६) आपण रोजच्या जीवनात वावरतांना मुलींची, महीलांची छेडखानी होतांना दिसते. मुली शाळा, कॉलेज मध्ये जातांना व येतांना रस्त्यात बाजारात काही ठिकाणी टवाळखोर मुले कट्टा तयार करुन मुलींची छेड काढत असतात. काही ठिकाणी कॉलेजच्या गेटवर काही वेळा वर्गात मागच्या बाकावर बसुन काही वेळा रस्त्याने वाहन चालवितांना मुलीची छेड काढत असतात. त्याबाबतची माहिती तात्काळ वर्ग शिक्षक, प्राचार्य किंवा पोलीसांना द्यावी.

१७) मुलींची छेडखानी होवु नये म्हणुन यासाठी मुलींची छेड काढणारे संस्थेत टवाळखोर मुलांच्या कट्टया विषयी माहिती निर्भय पथकास किंवा पोलीस नियंत्रण कक्ष यांना फोनद्वारे माहिती द्यावी. तसेच त्यांना वर्गात कॉलेज परिसरात रस्त्याने जातांना वाहनांवरुन छेड काढणा-यांची माहिती द्यावी. तसेच कॉलेज मधील प्राध्यापक, प्राध्यापिक यांनी टारगट मुलां विषयी माहिती पोलीसांना द्यावी.

१८) विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना आतंकवादाशी सलग्न असलेल्या सिमी सारख्या संघटनामध्ये व त्याच्या कारवायांमध्ये सहभागी होत असतात, असे निष्पण्ण झाले आहे. तरी कट्टरवादी संघटना व धर्मांध नेते व संघटना त्यांचेशी संबंध ठेवणारे विद्यार्थ्यांवर बारकाईने लक्ष ठेवावे व त्याबाबत माहिती पोलीसांना द्यावी.

१९) लहान मुले अंध व्यक्ती व जेष्ठ नागरीक यांना रोजच्या दैनंदिन जीवनात विद्यार्थ्यांनी/पोलीस मित्रांनी वाहतुकीतुन रस्ता पार करुन देणे, प्रवासात त्यांना प्राधान्याने जागा देणे, चढतांना व उतरतांना त्यांना मदत करणे, तसेच आपल्या सोसायटीत जेष्ठ नागरीक राहतात, त्यांची मुले नोकरीसाठी बाहेरगांवी सैन्य दलात असतात अशांना त्यांच्या गरजांनुसार पोलीस मित्रांनी मदत करणे गरजेचे आहे.

२०) फसवणुकीचे गुन्हे :- सध्याचे धकाधकीचे युगात विविध माध्यमातुन विविध प्रकारच्या जाहिराती येत असतात, काही ठिकाणी मोठमोठे होर्डिंगस् लावले जातात, वृत्तपत्र, मासिक, साप्ताहिक, टि.व्ही. सोशल मिडीयाचे माध्यमातुन जनतेला आकर्शित केले जाते. प्रशस्त व सुसज्ज कार्यलय थाटली जातात, कार्यलय व जाहिरात पाहुन नागरीक व सुशिक्षित युवकांना नोकरीचे अमिष दाखविले जातात, पैसे गुंतवणुक केल्यानंतर अव्वाचे सव्वा व्याजदर दिले जाईल असे दर्शविले जाते. मोबाईल फोनव्दारे, प्रत्यक्ष संभाषणाने, एस.एम.एस.ने मोठमोठया रकमेची व वस्तुचे बक्षिसांविषयी अमिष दाखविले जातात. अशा प्रकारच्या खोटया जाहिरातींचे माध्यमातुन नागरीक व तरूण वर्गाची फसवणुक होते. तरी अशा प्रकारचे फसव्या जाहिरातींची शहानिशा करण्यासाठी संबंधीत जाहिराती बाबत पोलीसांचे निदर्शणास आणुन त्यावर पोलीस त्या जाहिराती बाबत सत्यता पडताळुन पाहतील जेणेकरून फसव्या जाहिरातींबाबत वेळीच माहिती पोलीसांना झाल्याने जनतेची फसवणुक होणार नाही. वृत्तपत्र, दुरचित्रवाहिनी, मासिके, सोशल मिडीया यामध्ये जाहिरातींचे नावाखाली संबंधीत प्रसार माध्यमांची दिल्या गेलेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत कोणत्याही प्रकारे शाश्वती दिलेली नसते, तरी त्या जाहिराती फसव्या राहण्याची शक्यता असते.

शिक्षित, उच्च शिक्षित तरूण - तरूणी यांना विदेशात नोक-यांची ओढ असते, सध्या प्रत्येक शहरामध्ये खोटया जाहिराती देवुन तरूणांना विदेशात मोठया पगाराच्या नोक-या उपलब्ध करून देवु असे सांगणा-या खोटया संस्था अस्तित्वात आलेल्या आहेत. ते तरूणांना विदेशी नोकरीचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन पासपोर्ट व्हिसाचे बहाण्याने मोठया रक्कमा घेवुन फसवणुक करीत आहेत. ब-याच वेळेला काही बनावट पासपोर्ट व बनावट व्हिसाव्दारे परदेशात पाठविले जाते. परदेशात गेल्यानंतर पासपोर्ट व व्हिसा बनावट असल्यामुळे तेथे त्यांचेवर त्या देशातील प्रचलित कायदयानुसार कारवाई होते.

तसेच चिटफंड कपंनीव्दारे लोकांना कमी कालावधीत ठेवीवर दामदुप्पटीने पैसे देवुन फसवणुक केली जाते अशा वेळी पोलीस मित्रांनी चिटफंड, वित्तीय संस्था आपले शहरात असलेबाबत पोलीसांना आगाऊ सुचित करावे व ठेवीदारांना भावनिक आव्हान करून पैसे गुंतवणुक न करण्याबद्दल सांगावे.

तसेच काही मोबाईल कंपन्या व त्यांचे एजंट हे इमारतीवर किंवा मोकळया जागेवर मोबाईल टॉवर उभा करून त्याचे जास्तीचे भाडे देण्याबद्दल जाहिराती करतात व अशा लोकांकडुन ते आगाऊ पैसे घेवुन फसवणुक करतात.

काही वेळा ग्राहकांना मी बॅंकेतुन बोलतो असे भासवुन तुमचे ए.टी.एम कार्ड बंद होणार आहे असे सांगुन ग्राहकांचे बॅंक अकाऊंट नंबर, ए.टी.एम.चा पिनकोड नंबर विचारून ग्राहकांकडुन संपुर्ण माहिती घेवुन त्यांचे अकाऊंट मधील पैसे परस्पर काढुन घेतात व ग्राहकांची फसवणुक करतात याबाबत सुध्दा पोलीस मित्रांनी जनतेमध्ये जनजार्गती मोहिम राबवावी.

तसेच काहीवेळा बांधकाम करतांना सोने सापडले आहे ते सोने शुध्द असुन ते बाजार भावापेक्षा कमी किंमतमध्ये उपलब्ध करून देतो त्यासाठी आगाऊ रक्कम दया असे संबंधीत ग्राहकाला भावनिक आव्हान करून फसविले जाते.

तरी पोलीस मित्रांनी वरील प्रमाणे बेकायदेशीर रित्या नोकरीचे अमिष दाखविणे, ए.टी.एम. कार्ड फसवणुक, खाजगी वित्तीय संस्था यांचे बाबत माहिती मिळल्यास तात्काळ पोलीसांना कळविणे गरजेचे आहे जेणेकरून तरूणांची / लोकांची आर्थिक फसवणुक होणार नाही.

२१) सायबर क्राईम :- आजच्या आधुनिक विज्ञानाचे युगात इंटरनेटचे वाढते वापराव्दारे मोबाईल बॅंकिंग, ई-सेवा, ऑनलाईन शॉपिंग, नेट बॅंकिंग याव्दारे दैनंदिन व्यवहार केले जातात व ब-याच वेळा याप्रकारे ऑनलाईन सेवा घेतांना ग्राहकांची मोठया प्रमाणात फसवणुक होत असते. फसवणुक झाले नंतर इंटरनेट युझर्सचा पत्ता लागत नाही व फेक (बनावट) वेबसाईट असल्यामुळे पोलीसांना तपासकामात गुंतागुंतीचे होते. तसेच इंटरनेटचे माध्यमातुन ई-मेल हॅकिंग, थेप्ट पायरसी, प्रोनोग्राफी इत्यादी गुन्हे केले जातात.

तरी पोलीस मित्रांनी अशा व्यक्तींवर व सायबर कॅफेवर विशेष लक्ष केंद्रित करून काही माहिती मिळाल्यास पोलीसांना त्याची आगाऊ माहिती तात्काळ दयावी.

२२) घरमालक व भाडेकरू :- महाराष्ट्रात मध्यमवर्गीय व दारिद्रय रेषेखाली राहणारे लोकांचे प्रमाण बरेच मोठे आहे, त्यामुळे बरेच लोक भाडयाने राहतात. गरीब लोक झोपडपट्टीत भाडयाने राहतात व मध्यमवर्गीय हे त्यांना परवडेल अशा लोकवस्तीमध्ये राहतात. काही असमाजिक तत्वे सर्वसाधारण व साध्याभोळया लोकांचा फायदा घेवुन लपुन राहुन चोरी, जबरी चोरी, दरोडा, घरफोडी, चैन स्नॅचिंग व दहशतवादी कृत्यांसाठी घर भाडयाने घेवुन राहतात. त्यामुळे ते त्यांचे अस्तित्व सहज पोलीसांपासुन

लपवितात, व त्यांचे काम साध्य करून इतरत्र पळुन जातात व त्यांचा ठावठिकाणा लागण्यास ब-याच ठिकाणी पोलीसांना अपयश येत असते. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने घरमालकाने भाडेकरू ठेवले बाबतची माहिति संबंधीत पोलीस स्टेशनला, महानगरपालिकेला, नगरपालिकेला, ग्रामपंचायतीला देण्याचे बंधनकारक केलेले आहे.

यामध्ये पोलीस मित्रांचा सहभाग देखील अत्यंत महत्वाचा आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये जिल्हयातील विविध भागातील युवक व युवती उच्च शिक्षण घेण्यासाठी जिल्हयाचे ठिकाणी व तालुक्याचे येत जात असतात, त्यांची माहिति त्यांचे गावातील, मोहल्ल्यातील राहणा-या सर्व नागरीकांना देणे गरजेचे आहे. घरमालकाच्या मनामध्ये पोलीसांबद्दल एक विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. संशयीत वाटणारा भाडेकरू, ज्याच्याकडे चौकस नजरेने बघुन हालचाली संशयीत वाटत असल्यास त्वरीत संबंधीत पोलीस स्टेशनला माहिती दिल्यास उपयुक्त ठरू शकते.

२३) व्यसनाधिनता :- भारतातील नागरीकांच जीवनमान उंचावले आहे, त्यामुळे विद्यार्थी शालांत परिक्षा पास झालेनंतर कनिष्ठ महाविद्यालयात जात असतांना त्यांचेकडे दुचाकी, चारचाकी वाहने असतात, पालकांकडुन पॉकेटमनी दिला जातो, त्यातुन तरूण तरूणी यांच्यात चंगळवाद वाढलेला आहे. त्या चंगळवादातुन दारू, ड्रग्स्, यासारखे नशेचे व्यसन लागलेले आहे. उच्च शिक्षणासाठी मुले बाहेरगावी व मोठया शहरात जात असतात, त्यावेळी त्यांचेवर प्रसार माध्यमे, वाईट संगत, पालकांचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे त्यांचेमध्ये व्यसनाधिनता वाढते व त्या व्यसनांची पुर्तता करण्यासाठी पैशांची कमतरता भासल्यानंतर ते आपोआप गुन्हेगारीकडे वळतात. अशावेळी पोलीस मित्रांनी अशा तरूण तरूणींची माहिती शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, भाडयाने राहणारे विद्यार्थ्यांकडे विशेषल लक्ष देवुन त्यांची इत्यंभुत माहिती पोलीसांना दयावी.

२४) वाहतुक नियम व नियमन :- दररोज सकाळी उठल्या बरोबर आपण हातात वृत्तपत्र घेतल्यावर अपघाताविषयी माहिती / बातमी ठळकपणे छापुन आलेली असते. आपण बातमी वाचल्यानंतर थोडा वेळ हळहळतो, व वाहन चालविणा-या चालकास दुषणे देतो. त्यांनतर ते सर्व विसरून आपण ये रे माझे मागल्याप्रमाणे वागत असतो.

ब-याच अंशी अपघातात जखमी होणारा युवा वर्ग असतो, याचे मुक्त कारण सळसळते रक्त सुचना दिल्यानंतरही वाहतुकीचे नियमांचे पालन न करणे, मर्यादित वेगापेक्षा वेगाने वाहन चालविणे, स्टंटबाजी करणे, वाहतुक नियम व सांकेतिक चिन्हांचे मुद्दाम उल्लंघन करणे, नशेमध्ये वाहन चालविणे, हेल्मेट न वापरणे, प्रेशर हॉर्नचा वापर करणे, फॅन्सी नंबरप्लेट लावणे, ट्रिपलसीट बसुन वाहन चालविणे, दुचाकीवर गॅस सिलेंडरची वाहतुक करणे, पेट्रोल टॅंकवर अवजड सामान ठेवणे इत्याची सर्रास प्रकार दैनंदिन जीवनात दिसुन येतात. तसेच वाहतु सिग्नलचे मुद्दाम उल्लंघन करणे, केळीची सालटी , निसरडा कचरा रस्त्यावर टाकणे, दुचाकी वाहन चालवितांना हॉरिझोंटल (क्षितीज समांतर )वाहन चालवुन रस्ता अडवितात, तसेच विद्यार्थी एकामागुन एक सायकलीवर न चालता सायकल समांतर चालवुन आपसात बोलत रस्ता आडवुन रहदारीस अडथळा निर्माण करतात, त्यामुळे देखील अपघात होत असतात. तसेच रात्रीचे वेळी प्रवास करतांना किंवा वाहन चालवितांना पांढरे कपडे परिधान करावे, गाडीचे हेडलाईट, टेल लाईट, रिफ्लेक्टर चांगले लावलेले असावेत. विनाकारण चौकांमध्ये रोडवर उभे राहु नये. वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर करू नये, वाहने पार्किंगमध्येच पार्क करावी. वाहतुक नियमांचे पालन करावे, सुरक्षिततेबाबत विचार करावा. रस्त्यात लहान मुले, अंध व्यक्ती, ज्येष्ठ नागरीक यांना रस्ता ओलांडण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे मदत करणे. अपघातांना आळा बसेल यासाठी प्रयत्न करणे, अशी वाहतुक नियोजनाची कामे पोलीस मित्रांकडुन अपेक्षित आहेत.

२५) पोलीस मित्राची आपत्ती व्यवस्थापन कार्यात मदत :- नाशिक ग्रामीण जिल्हयात प्रामुख्याने निफाड, पिंपळगाव, लासलगाव, मालेगाव शहर, छावणी, किल्ला, आझादनगर, इगतपुरी, घोटी, कळवण, नांदगाव सिन्नर येथे पुरपरिस्थिती निर्माण होण्याचे प्रमाण जास्त असुन त्यासाठी करावयाची कार्यवाही खालील प्रमाणे आहे. नैसर्गिक आपत्ती आल्यास त्याचे व्यवस्थापन करणे बाबत पोलीस मित्रांचे सहाय्य घेण्यात येईल.

१) अतिवृष्टी व पुर नियंत्रण :-

अ) मनुष्यबळ व साधन सामुग्री व्यवस्थापन करणे.
ब ) प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे
क) पुर व महापुर आल्यावर करावयाची कारवाई
ड) कृतीशील टप्पा
इ) पाठपुरावा टप्पा

२) भुकंप आल्यास
३) आग लागल्यास
४) चेंगराचेंगरी झाल्यास
५) वायु / गॅस गळती
६) साथीचे रोग
७) दुष्काळ परिस्थिती
८) आतंकवादी हल्ला (ओलीस ठेवलेले असतांना)

वरील प्रमाणे प्रसंग उद्‌भवल्यास पोलीस मित्रांना आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देण्यात यावे व आदर्श अभियान कार्यपध्दती बाबत काय कारवाई कराव व काय कारवाई करू नये याबाबत त्यांना अवगत करावे. जेणेकरुन वरील प्रसंग घडल्यास पोलीस मित्रांची पोलीस दलास मदत होईल.

## पोलीस मित्र संकल्पना राबविण्याचे उद्देश :-

१) पोलीस - जनता संबंध सुधारणे.

२) लोकांमध्ये गुन्हयाविषयी जाणीव - जागृती निर्माण करणे व त्यांना गुन्हे प्रतिबंध साठी सक्षम बनविणे.

३) लोकांमध्ये नागरी जबाबदारीची आणि कर्तव्याची जाणीव निर्माण करणे.

४) मानवी मुल्यांचे शिक्षण देणे.

५) गरजेच्या वेळी पोलीसांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

६) पोलीस यंत्रणेविषयी अभिप्राय मिळणेसाठी यंत्रण उभी करणे.

७) कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास स्थानिक संसाधनामधुन तात्काळ मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

८) पोलीस प्रशासनात पारदर्शकता आणणे.

९) सर्व सामान्यांना पोलीसांच्या जबाबदा-या व भुमिका समजावुन देणे.

१०) गुप्त वार्ताचे संकलण करणे.

११) ‘‘Community Policing’’ या संकल्पनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे .

१२) सामाजिक सहकार्यातुन जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.

१३) पोलीस आणि जनतेमधील दुरावा कमी करणे.

१४) लोकसहभागातुन शांतता व सुव्यवस्था कायम राखणे.

## पोलीस मित्रांची पात्रता :-

१) पोलीस मित्राचे वयाची अट किमान १८ वर्षे पुर्ण असावे.

२) पोलीस मित्र हे गुन्हेगारी पार्श्वभुमीचे नसावे, ते चारित्र संपन्न असावे.

३) पोलीस मित्र कोणत्याही धार्मिक, जातीय व राजकिय दृष्टया तटस्थ असावा.

४) पोलीस मित्रांची संकल्पना राबवितांना सर्व धर्मातील व जातींमधील लोकांचा समावेश असावा व विविध भाषा बोलणारे लोकांचा त्यात समावेश असावा.

५) तो स्थानिक रहिवासी असावा व शारिरीक दृष्टया सक्षम असावा.

६) पोलीस मित्र हा व्यसनी नसावा.

७) पोलीस मित्र या संकल्पनेत समाजातील ज्येष्ठ नागरीक, महिला, वकिल, डॉक्टर, विदयार्थी, विदयार्थीनी, स्वयंसेवी संघटनांचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, प्रतिष्ठीत नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, माजी सैनिक, माजी पोलीस अधिकारी व कर्मचारी अशांचा त्यामध्ये समावेश असावा.

८) पोलीस मित्राने त्याचा बहुमूल्य वेळ पोलीस सेवेसाठी सकारात्मकरित्या देणे गरजेचे आहे.

९) पोलीस मित्राने जनतेशी व पोलीसांशी चांगले संबंध ठेवणे अपेक्षित आहे.

१०) पोलीस मित्राचे कर्तव्य हे स्वेच्छेने असुन त्याबाबत त्याने केलेल्या कर्तव्याचा पोलीस खात्याकडुन अगर जनतेकडुन कुठलाही मोबदला दिला जाणार नाही.

११) पोलीस मित्राने तो राहत असलेल्या ठिकाणाचे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्नांची माहिती स्थानिक नागरीकांकडुन करून घ्यावी.

१२) पोलीस मित्र करत असलेल्या कर्तव्याची माहिती बाबत जनतेमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात प्रसिध्दी दयावी.

## पोलीस मित्रांकडुन अपेक्षित कार्ये / भुमिका :-

१) समन्स / वॉरंट बजावणी करण्यामध्ये पोलीस मित्रांची मदत घेणे.

२) ज्या ठिकाणी मंदिर, मशिद, चर्च , स्तुप इत्यादी धार्मिक स्थळांवर दर्शनाचे वेळी येणारे भाविकांची व्यवस्थित रांग लावणे.

३) हरविले मुले / मुली, व्यक्ती यांच्या शोध कार्यात मदत घेणे.

४) नाकाबंदीच्या वेळी पोलीस मित्रांची मदत घेणे

५) रात्रीच्या पेट्रोलिंगच्या वेळी त्यांना सोबत घेवुन पेट्रोलिंग करावी.

६) नाकाबंदीच्या दरम्यान वाहतुकीचे विनिमय करणे

७) धार्मिक उत्सवाच्या वेळी पोलीस मित्रांची मदत घेणे.

८) पोलीस स्टेशनचे गुन्हयांचे तपासात तसेच इतर कामकाजात त्यांची मदत घेणे.

९) एक गणवेशधारी पोलीस व सोबत ०२ पोलीस मित्र असणे अपेक्षित आहे.

१०) पोलीस मित्र म्हणुन काम करीत असतांना देण्यात आलेल्या ओळखपत्राचा दुरुपयोग करू नये.

११) पोलीस मित्राने जनतेला प्रथम खबरी रिपोर्ट देतांना व अपघात झाल्याचे ठिकाणी जनतेला योग्य ते मार्गदर्शन करावे.

**पोलीस मित्रांना पोलीस दलातर्फे देण्यात येणारे प्रशिक्षण :-**

१) कम्युनिटी पोलीस हि संकल्पना राबविणे बाबत.

२) पोलीस मित्राची समाजामध्ये काय भुमिका व कर्तव्य आहे.

३) सांघिक कर्तव्याबाबत

४) संगणक प्रशिक्षण

५) पोलीस खात्याची संपुर्ण माहिती

६) समाजामध्ये विविध प्रकारचे गुन्हे घडल्यानंतर काय कारवाई करावी व काय करू नये.

७) व्यक्तिमत्व व श्रवण कौशल्य

८) कम्युनिकेशन कौशल्य

९) मृत्युपूर्व जबाब घेणेसाठी पोलीस मित्रांची मदत घेणे बाबत प्रशिक्षण

१०) लहान मुल, युवती, महिलांचे छेड, लैंगिक अत्याचार वगैरे गुन्हयांमध्ये पोलीस मित्रांना प्रशिक्षण देणे.

११) फसवणुक व सायबर क्राईम बाबत प्रशिक्षण देणे

१२) दहशतवाद / सिमी / नक्षलवाद रोखणेसाठी प्रशिक्षण

**पोलीस मित्राची प्रसार माध्यमांसोबतची भुमिका :-**

१) पोलीस मित्रांनी पोलीस दलाचे चांगले कर्तव्य केले बाबत प्रसार माध्यमांकडुन त्यांची कोणत्याही प्रकारची प्रशंसा किंवा त्यांनी केलेल्या कामाची दखल घेतली जात नाही. अशावेळी प्रसार माध्यमांना पोलीस मित्रांनी उत्कृष्टरित्या कार्य केले बाबत प्रसार माध्यम / वृत्तपत्रामध्ये मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. जेणेकरून इतर पोलीस मित्रांचे जनतेमध्ये मनोधैर्य उंचविण्यास मदत होईल व त्यांना समाजाची सहानुभूती व आपुलकी मिळेल.

**पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी पोलीस मित्रांची बैठक घेणे बाबत :-**

१) प्रत्येक पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी आठवडयातुन किमान एक वेळा आपले पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस मित्रांची बैठक आयोजित करावी. व त्या बैठकीमध्ये पोलीस मित्रांकडुन त्यांनी केलेल्या कामाचा व स्थानिक कायदा व सुव्यस्थेचे प्रश्नांचा आढावा घेवुन त्यांना नव्याने पुन्हा जबाबदारीचे कर्तव्य दयावे. तसेच पोलीस - जनता संबंध सुधारण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच पोलीस मित्रांकडुन सुचविण्यात आलेल्या तक्रारी / सुचनांचे अनुषंगाने प्रभारी अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

# प्रतिज्ञापत्र

मी ................................................................... वय............ व्यवसाय ............... रा. .................................. ता................ जि.नाशिक, मोबाईल क्र. .......................... असे प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की, मी नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस मित्र या संकल्पनेत स्वेच्छेने सदस्य झालेलो असुन या पोलीस मित्र अभियानात मी कोणतेही मानधनाशिवाय काम करीत आहे. तसेच पोलीस मित्र म्हणुन काम करीत असतांना मला कोणतीही शारिरीक किंवा मानसिक ईजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी स्वत:ची राहिल. मी असेही जाहिर करतो की, माझे विरुध्द नाशिक ग्रामीण जिल्हयातील किंवा इतर कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हयाची नोंद नाही. तसेच भविष्यकाळात कोणत्याही बेकायदेशीर कृत्यात मी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सहभाग घेणार नाही.

माझी वरील माहिती खोटी किंवा दिशाभुल करणारी असल्याची आढळुन आल्यास किंवा माझेकडुन कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग झाल्यास माझे पोलीस मित्र सदस्यत्व रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

**समक्ष**

पोलीस मित्राची सही :-

नाव :-

दिनांक :-

प्रभारी अधिकारी,

......................... पोलीस स्टेशन

# पोलीस मित्र फॉर्म

Passport Size Photo

मी ................................................................ पोलीस मित्र अभियान या योजने अंतर्गत सदस्य होण्यास इच्छुक आहे. माझी वैयक्तिक माहिती फॉर्म मध्ये भरून देत आहोत.

१) संपुर्ण नाव :- ..........................................................................

२) वय / जन्मतारीख :- ..........................................................................

३) शिक्षण :- ..........................................................................

४) राहण्याचा पुर्ण पत्ता :- ..........................................................................

५) मोबाईल क्रमांक :- ..........................................................................

६) रक्तगट :- ..........................................................................

७) ओळखचिन्ह :- ..........................................................................

८) व्यवसाय :- ..........................................................................

९) ई-मेल आयडी :- ..........................................................................

१०) विशेष नैपुण्य :- ..........................................................................

मी निस्वार्थीपणे पोलीस मित्र या अभियानाचा सदस्य म्हणुन काम करण्यास इच्छुक आहे. माझी गरज पडल्यास विधायक कामासाठी मदत करण्यास सदैव तयार आहे. मी सदर कर्तव्याबाबत कोणताही मोबदला पोलीस दलाकडुन घेणार नाही. व पोलीस मित्र अभियानाचा दुरूपयोग करणार नाही.

सदरचा भरलेला फॉर्म हा आपले नजीकचे पोलीस स्टेशनला जमा करावा. पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी सदरचा फॉर्म दोन प्रतिमध्ये भरून एक प्रत आपले अभिलेखावर ठेवुन एक प्रत स्थानिक गुन्हे शाखा नाशिक ग्रामीण कार्यालयास सादर करावी.

समक्ष,

प्रभारी अधिकारी

................ पोलीस स्टेशन

पोलीस मित्राची सही -

नाव -

दिनांक -

# नाशिक ग्रामीण पोलीस दल

# पोलीस मित्र अभियान

# सन २०१५